# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## Maharashtra Electricity Regulatory Commission


निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/१३/२०२४/०६०२ दिनांक: ०१.१०.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २०.०८.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | २६.०८.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १०.०९.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : | ०१.१०.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. १३/२०२४**

श्री. चंदू विजय पाटील ... **अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... **प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.०८.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०८.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक १९.०८.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.०८.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक ०९.०९.२०२४ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक १०.०९.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक १९.०९.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०१.१०.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक ०१.१०.२०२४ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी हजर झाले नाहीत तथा सुनावणीची तारीख/वेळ बदलून देण्याची कुठलीही विनंती आपीलार्थी कडून प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी सुनावणी साठी हजर झाले व त्यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

१. अर्जासोबत जोडलेल्या व मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे कार्यालयात दिनांक ०९.०६.२०२४ रोजी ईमेलद्वारे दाखल केलेल्या तक्रार अर्जातील गंभीर मुद्यांचे गांभीर्याने अवलोकन करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ कलम ८.१०.१ नुसार महावितरणचा वसई मंडळ विभाग कार्यक्षेत्राचा परवाना रद्द करण्याकामी मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या कार्यालयाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी.

२. तसेच तक्रार अर्जाच्या संबंधित महावितरणच्या वसई मंडळातील अधिकाऱ्याविरुद्ध विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १४९ नुसार कारवाई होण्याकामी केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती देण्यात यावी. (मा. मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायाधीश एस. व्ही. गंगापुरवाला व संदीप व्ही. मारणे ह्यांचे खंडपीठाने जनहित याचिका क्र. १०५/२०२२ मध्ये दिनांक २९.०३.२०२३ रोजी दिलेल्या अंतिम आदेशानुसार मला माहिती अधिकारात माहिती संकलित करून पुन्हा दावा दाखल करण्याची मुभा दिल्याची नोंद घेत प्रकरणी सदर माहिती अधिकार अर्जाची माहिती शक्य तितक्या शीघ्रतेने देण्यात यावी ही विनंती.)

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

संबंधित प्रकरणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयात 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२' नुसार, कोणत्याही प्रकारची याचिका मा. आयोगासमोर दाखल झालेली नसल्यामुळे यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक माहिती उपलब्ध करून दिल्या नसल्याकारणाने.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

सदर अपीलामध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ कलम ८.१०.१ नुसार महावितरणचा वसई मंडळ विभाग कार्यक्षेत्राचा परवाना रद्द करण्याकामी आयोगाच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागण्यात आलेली आहे. शिवाय, महावितरणच्या वसई मंडळातील अधिकाऱ्याविरुद्ध विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १४९ नुसार कारवाईची माहिती मागण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रकरणाबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यालयात 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) विनियम, २०२२ नुसार मा. आयोगासमोर कोणत्याही प्रकारची याचिका दाखल झालेली नाही त्यामुळे यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

शिवाय, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम, २०२० तर्फे मंच उपलब्ध करून दिलेला आहे. गाऱ्हाणे निवारण मंचाच्या कार्यपद्धतीची माहिती www.merc.gov.in या संकेत स्थळावर सविस्तररित्या उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे उपलब्ध मंचाचा उपयोग करण्याबाबत कळविण्यात येत आहे.

त्यानुसार सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>**निर्णय**</u>

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(अभिजीत वि. चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,

श्री. चंदू विजय पाटील,
मनवेलपाडा रोड, मीठबाव वाडी,
जीवदानी प्लाझा इमारती समोर,
विरार (पूर्व), ता. वसई.
जि. पालघर पिन – ४०१३०५.

(अभिजीत वि. चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई